**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ०६.४०)**

**शनिवार, दिनांक३१ जुलै २०२१**

***एक महत्वपूर्ण संदेश***

**१८ वर्षांवरील सर्वांसाठी कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहीम सुरू झाली आहे . मुखपट्टी वापरा .नंतरही काळजी घ्या .लसीकरण करून घ्या, सुरक्षित अंतर राखा, हात, चेहरा वारंवार स्वच्छ धुवा .कोविड प्रतिबंधासाठीचे नवे निर्बंध पाळा . बद्दल काही प्रश्न १९-कोविड .विनाकारण घराबाहेर पडून गावात गर्दी करू नका या राष्ट्रीय १०७५ आणि ०४६-९७८-२३-०११ असतील तर; तसंच ०२० ३९४-१२७-२६- या महाराष्ट्रासाठीच्यामदतवाहिनी क्रमांकांवर संपर्क साधा.**

**ठळक बातम्या**

1. **माओवाद्यांचा हिंसाचार आटोक्यात आणत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज नागपुरात 5 रेल्वे उड्डाणपुलांचं भूमिपूजन.**
3. **भाजपातर्फे राज्यातील सर्व विधानसभा मतदार संघात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी समर्थ बूथ अभियान आजपासून सुरू.**

**आणि**

4. **शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी आमदार भाई देशमुख यांचं निधन.**

********

**आयपीएस प्रशिक्षणार्थींसोबत संवाद**

माओवाद्यांचा हिसांचार आपण कठोर मेहनतीनं आटोक्यात आणत असून आदिवासी भागांमध्ये आपण विकास आणि विश्वासाचे नवे पुल बांधले असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आज सकाळी दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी

इथंआयपीएस प्रशिक्षणार्थीसोबत संवाद साधताना ते बोलत होते.आपल्यासारखं युवा नेतृत्व हे काम पुढे नेईल अशी खात्री असल्याचं मोदी यांनी सांगितलं. पोलिसांनी तंदुरूस्तीचा प्रचार-प्रसार केला तर समाजातील युवकांना देखील तंदुरूस्त राहण्यासाठी आणखी प्रोत्साहन मिळेल अशी सूचना त्यांनी केली. कामातील कौशल्यं आणि तंदुरूस्ती या आपल्या पोलिस दलाच्या दोन सर्वात महत्वाच्या गरजा असल्याचं सांगून पंतप्रधानांनी आपल्यासारखे युवा पोलिस अधिकारी पोलिस यंत्रणेमध्ये अशा प्रकारच्या सुधारणा लागू करु शकतात असा विश्वास व्यक्त केला. गेल्या ७५ वर्षांमध्ये, भारतानं एक उत्तम पोलिस सेवा उभारण्याचा प्रयत्न केला आहे, पोलिस प्रशिक्षणाशी निगडीत पायाभूत सुविधा देखील अलिकडील वर्षांमध्ये खूप सुधारल्या असल्याचं मोदी म्हणाले. यामध्ये सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना पंतप्रधानांनी विविध प्रश्न विचारले त्यावर या अधिकाऱ्यांनी आपले विचार मांडले.

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती एम. वेन्कैय्या नायडू यांनी, बालकांसाठी कोविड प्रतिबंधक लस लवकरात लवकर विकसित करण्याची विनंती वैज्ञानिक जगताला केली आहे. भारत बायोटेक कंपनीच्या हैद्राबाद इथल्या जीनॉम व्हॅली प्रकल्पाला काल त्यांनी भेट दिली. त्यानंतर संस्थेच्या वैज्ञानिक आणि कर्मचार्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.कोरोना संसर्गापासून वाचण्यासाठी लसीकरणाशिवाय पर्याय नसून, आपल्याला आणि आपल्या जवळच्यांना संरक्षण देण्याचा हाच एक मार्ग आहे असं त्यांनी नमूद केलं. देशात आणि देशाबाहेरील लसीकरण मोहिमेत महत्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल त्यांनी भारत बायोटेकची प्रशंसा केली.

**सी.आय.आय**

लसीकरण मोहिमेला वेग आणण्यासाठी भारतीय उद्योग परिषद - सी आय आयनं सीरम इंस्टीट्युट ऑफ इंडिया या कंपनीबरोबर करार केला आहे. यानुसार आता देशातल्या छोट्या गावांमध्ये आणि ग्रामीण भागांमध्ये, लसीकरणाची व्याप्ती वाढवण्यासाठी, विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. रुग्णालये आणि

उद्योगजगत यांच्यातला दुवा बनत ‘सीआयआय’ आणि सीरम या संस्था लसीकरण मोहिमेला वेग आणण्याचा प्रयत्न करणार आहेत. या मोहिमेमुळे दुर्गम भागातल्या लोकांपर्यंत कमी कालावधीत पोहोचता येईल, असं सीरम कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांनी म्हटलं आहे.

**आयुष्मान भारत योजना**

आयुष्मान भारत योजनेमध्ये आत्तापर्यंत १० कोटी कुटुंबांना समाविष्ट करण्यात आलं असून,या योजने द्वारे आता ५० कोटी व्यक्ती ५ लाखापर्यंत मोफत उपचारास पात्र असल्याचं आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री मनसुख मांड्वीय यांनी काल लोकसभेत बोलताना सांगितलं. यावेळी मांड्वीय म्हणाले की आयुष्मान भारत ही योजना अमेरिकेच्या ओबामा केयर योजनेपेक्षा ५ पट मोठी योजना आहे. सरकारन अवयवदान आणि अवयव प्रत्यारोपणासाठी अनुकूल वातावरण तयार करण्याच्या दिशेनं उपाय योजना सुरू केल्या आहेत. आयुष्मान भारत योजनेची सुरुवात सर्वांना आरोग्य विमा योजनेचा लाभ घेता यावा यासाठी  करण्यात आली होती. त्याची आखणी विकासाचं उद्दिष्ट समोर ठेऊन करण्यात आली असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

**रेल्वे उड्डाण पुलाचे भूमिपूजन**

महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड - महारेल या महाराष्ट्र शासन आणि रेल्वे  मंत्रालयाच्या सार्वजनिक क्षेत्र उपक्रमाव्दारे  नागपुरातील कडबी चौक ते गोळीबार चौक दरम्यान नवीन उड्डाणपुलाचे तसेच नागपूर इतवारी ते नागभीड रेल्वे लाईन वरील चार नवीन रेल्वे उड्डाण पुलाचे भूमिपूजन आज केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आल. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे दूरस्थ प्रणालीद्वारे उपस्थित होते. कार्यक्रमाला पालकमंत्री डॉ.नितीन राऊत, पशुसंवर्धन मंत्री सुनील केदार, महापौर दयाशंकर तिवारी, जिल्हाधिकारी विमला आर प्रामुख्यानं उपस्थित होते. महारेलला केंद्रीय रस्ते निधीतून या कामासाठी निधी देण्यात आला असून नागपूरच्या सर्व भागात बनणाऱ्या या उड्डाणपुलामुळे अतिक्रमणाची समस्या सुटणार आहे असे प्रतिपादन नितीन गडकरी यांनी यावेळी केलं. राज्याची

राजधानी मुंबई आणि उपराजधानी नागपूर यांना जवळ आणण्यासाठी बाळासाहेब समृद्धी महामार्गाचे बांधकाम चालूच आहे . नैसर्गिक आपत्तीमध्ये रस्ते पूल हे खचून जाऊ नयेत यासाठी रस्त्याचे बांधकाम मजबूत करण्यासाठी केंद्रीय रस्ते मंत्रालयाची तांत्रिक मदत आपल्याला लागेल असे यावेळी बोलताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. गोळीबार चौक दरम्यान नवीन उड्डाणपुलाची लांबी 3 किलोमीटर असून प्रकल्पाची किंमत 146 कोटी आहे.

**आश्रमशाळा**

मिशन बिगीन अगेन' अंतर्गत डिसेंबर 2020 पासून सुरू करण्यात आलेले शाळांचे वर्ग फेब्रुवारी 2021 पासून कोरोनाच्या दुसऱ्या लाटेच्या प्रादुर्भावामुळे पुन्हा बंद करण्यात आले होते. आता आदिवासी विकास विभागाच्या 26 जुलै 2021 च्या शासन निर्णयानुसार आश्रमशाळातील इयत्ता 8 वी ते 12 वी चे वर्ग सोमवार दि. 2 ऑगस्ट 2021 पासून सुरु करण्यात येत आहेत, असे आदिवासी विकास आयुक्त हिरालाल सोनवणे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

**न्यूज ऑन ए आय आर लोकप्रिय**

न्यूज ऑन ए आय आर या ॲपद्वारे आकाशवाणीचं थेट प्रसारण जयपूर आणि पाटणा या शहरांमधील युवकांमध्ये जास्त लोकप्रिय असल्याचं दिसून आलं आहे. या दोन शहरात ॲपद्वारे आकाशवाणीचं थेट प्रसारण ऐकणाऱ्या लोकांमध्ये ६० टक्के श्रोतावर्ग हा १८ ते ४५ वर्षे वयोगटातील असल्याचं निदर्शनास आलं आहे.देशातील मोठ्या शहरांमध्ये केलेल्या न्यूज ऑन ए आय आर च्या क्रमवार सर्वेक्षणात ही बाब समोर आली आहे. पुणे शहरानं आपल्या लोकप्रियतेचा परिचय आपल्या प्रसारणातून करून दिला असून मराठी प्रसारणाबरोबरच कन्नड आणि हिंदी भाषेतील प्रसारण सुद्धा तितकंच लोकप्रिय असल्याचं स्पष्ट झालं आहे. ताज्या क्रमवारीनुसार न्यूज ऑन ए आय आर या ॲपद्वारे होणाऱ्या आकाशवाणीच्या थेट प्रसारणात सर्व शहरांमध्ये पुणे आकाशवाणी अग्रस्थानी आहे. यानंतर बंगळूरू आणि हैद्राबाद केंद्रांचा क्रमांक लागतो. न्यूज ऑन ए आय आर या ॲपवरून प्रसार भारतीच्या २४० पेक्षा अधिक रेडीओ सेवांचं प्रसारण केलं जातं.

**समर्थ बूथ अभियान**

भाजप तर्फे राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात संघटना मजबूत करण्यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी "समर्थ बूथ अभियान" प्रारंभ करण्यात आला आहे, वर्धा जिल्ह्यात आज पासून या अभियानाला सुरुवात करण्यात आली, वर्धा जिल्ह्याचे खासदार रामदास तडस,भाजप चे प्रदेश सचिव अँड. धर्मपाल मेश्राम, माजी खासदार सुरेश वाघमारे यांच्या सह आमदार, भाजपचे सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. आज एकाच वेळी विविध 4 ठिकाणी या संपर्क बूथ अभियानाला सुरुवात करण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश भाजप तर्फे सुरू करण्यात आलेल्या डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी समर्थ बूथ अभियानाला "सशक्त बूथ-सशक्त भाजपा", "सशक्त महाराष्ट्र- सशक्त भारत" असे संबोधले जात आहे. आजपासून सुरू करण्यात आलेले हे समर्थ बूथ अभियान 17 सप्टेंबर पर्यंत म्हणजेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस पर्यंत चालणार आहे.

**पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री-रघुवीर हंसराज अहीर**

सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा व युवा क्षेत्रात कार्यरत युवा नेते रघुवीर हंसराज अहीर यांची महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता युवा मोर्चाच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र भाजयुमो चे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांनी त्यांनाहे पद सोपविले आहे. या नियुक्तीचे माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते देवेन्द्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील, माजी वित्त मंत्री तथा लोकलेखा समिती चे अध्यक्ष सुधिर मुनगंटीवार, पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री तथा राष्ट्रीय ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष हंसराज अहीर यांनी स्वागत करीत पुढील संघटनात्मक कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

**ग्रीन गो नीम उपक्रम- पत्रकार परिषद**

कडूलिंबाचे एक झाड दहा व्यक्तिंना वर्षभर पुरेल एवढे ऑक्सीजन देतो तसेच त्याची माती धरून ठेवण्याची क्षमता इतर झाडापेक्षा जास्त असते ज्यांमुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होते. या सगळ्याचा विचार करून आदित्य अनघा संस्थेने कडुनिंबाच्या झाडाची निवड केली.याचाच एक भाग म्हणून संस्थेतर्फे "गो

ग्रीन,गो नीम"हा उपक्रम राबविण्यात येणार असून १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालावधीत १ लाख कडुनिंबाच्या झाडाची लागवड करण्यात येणार असल्याची माहितीसंस्थेच्या श्रीमती सीमा सहस्त्रभोजने यांनी दिली.

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

राज्यात ५० पेक्षा कमी सदस्य असलेल्या सहकारी संस्थांना, सभासदांच्या प्रत्यक्ष सहभागाद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यास परवानगी देण्यात आली आहे. सहकार विभागाने याबाबतचे आदेश जारी केले आहेत. ५० पेक्षा जास्त सभासद संख्या असलेल्या सर्व सहकारी संस्थांनी, ऑनलाईन पद्धतीने वार्षिक सर्वसाधारण सभेचं आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**मारुती चितमपल्ली**

सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त दिला जाणारा, यंदाचा जीवनगौरव पुरस्कार, अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांना जाहीर झाला आहे. एक्कावन्न हजार रुपये रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि गौरवपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

**टोकियो ऑलिम्पिक**

टोकियोऑलिम्पिक स्पर्धेत भारताच्या पीवी सिंधुला चीनी ताई पेईच्या ताई झू यींन कडून पराभवाला सामोरे जावे लागले. उद्या सिंधु कांस्य पदकासाठी खेळेल. आज भारतीय महिला हॉकी संघानं दक्षिण आफ्रिकेचा चार - तीन असा पराभवकेला.थाळीफेकमध्ये भारताची कमलप्रीत कौर ६४ मीटर थाळीफेक करुन अंतिम फेरीसाठी पात्र ठरलीआहे. थाळीफेक मध्येच सीमा पुनिया तिच्या गटात सहाव्या क्रमांकावर राहीली. या गटात कोणत्याहीस्पर्धकाला पात्रतेसाठी आवश्यक असलेला ६४ मीटरचा टप्पा ओलांडता न आल्यानं अंतिम १२मध्ये स्थान मिळवण्याच्या सीमाच्या आशा कायम आहेत.मुष्टीयुद्धप्रकारात पुरुषांच्या ४८ ते ५२ किलो वजनी गटात अमित पंघालचा कोलंबियाच्या युबेरजन मार्टीनेजकडून चार - एक असा पराभव झाला. तीरंदाजीत अतनु दासचा पराभव झाला.

**गणपतराव देशमुख-निधन**

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि सांगोल्याचे माजी आमदार, भाई गणपतराव देशमुखयांच्या पार्थिव देहावर आज शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.  त्यांचंकाल रात्री सोलापुरातील एका खासगी रूग्णालयात निधन झालं. ते ९४ वर्षाचे होते.सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदारसंघातून ११ वेळा ते विधानसभेवर निवडून आले होते. २००९ च्या निवडणुकीत विजय मिळवून, करुणानिधी यांच्या पाठोपाठ दहाव्यांदा आमदारकीची निवडणूक जिंकणारे, देशमुख हे देशातले दुसरे आमदार ठरले होते. अत्यंत साधी राहणी असलेल्या गणपतरावांनी ५४ वर्षं सांगोल्याचं प्रतिनिधित्व केलं होते.आदर्श लोकप्रतिनिधी असलेल्या देशमुख यांनी शेतकरी, कष्टकरी आणि जन-सामान्यांप्रती आपली बांधिलकी शेवटपर्यंत जपली अशा शब्दांत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी गणपतराव देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली आहे.राजकारण आणि समाजकारणातील एक साधं, सात्विक व्यक्तिमत्व हरपलं अशा शब्दात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. तर गणपतराव देशमुख यांनी अर्ध्या शतकाहून अधिकच्या प्रदीर्घ संसदीय कारकिर्दीत ध्येयनिष्ठा, पक्षनिष्ठा कायम जपली. राजकीय, सामाजिक चळवळीला सुसंस्कृत चेहरा दिला; राजकारणाला नैतिक अधिष्ठान दिलं; अशा शब्दांत उप-मुख्यमंत्री अजित पवार यांनी गणपतराव देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

******